जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दि- 14-01-2020

तरुण भारत

# यशस्वी होण्यासाठी कामातील वेगळेपण टिकवा

## कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांचे विचार: प्रशासकीय सेवकांसाठी प्रशिक्षण शिबीर

प्रतिनिधी
कोल्हापूर

प्रामाणिकता हा सर्व मानवी सद्गुणांचा पाया आहे. आपली दूरदृष्टी जगाच्या कल्याणासाठी असली पाहिजे. ती स्वत:पूर्ती मर्यादित असू नये. तसेच आयुष्यामध्ये यशस्वी होण्यासाठी कामामधील वेगळेपण टिकवून ठेवणे आवश्यक आहे, असे विचार कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी मांडले.

शिवाजी विद्यापीठातील कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्यावतीने विद्यापीठातील प्रशासकीय सेवकांकरिता प्रशासकीय कौशल्ये वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीकोनातून पाचगणी येथील बहाई ॲकॅडमीमध्ये निवासी प्रशिक्षण शिबिर केले होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्यावतीने पाचगणी येथील बहाई ॲकॅडमीमधील प्रशासकीय सेवकांच्या शिबिरात मार्गदर्शन करताना कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर. सोबत डॉ. रचना शिखरे, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. लेझन आझादी

शिबिरामध्ये सेवकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

डॉ. नांदवडेकर पुढे म्हणाले, विद्यापीठाच्या भविष्यकालीन योग्य नियोजन आणि व्यवस्थापन केल्यास कोणत्याही प्रकारचा ताण येणार नाही. कार्यालयांमध्ये कामे करीत असताना संस्थेप्रती, कुटुंबाप्रती चांगला विचार केल्यास आनंदी जीवन जगता येईल. दैनंदिन कामांमध्ये प्रशासकीय कौशल्ये, परस्पर व्यक्ती संबंध, सकारात्मक दृष्टी, आयसीटी याचा योग्यपध्दतीने वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

मानसिक ताणाचे ओझे वाहणे टाळावे. नकारात्मक विचारांपासून नेहमी अलिप्त राहिले पाहिजे, असे डॉ. रचना शिखरे म्हणाल्या.

अध्यक्षस्थानावरून बहाई ॲकॅडमीचे संचालक डॉ. लेझन आझादी म्हणाले, प्रत्येक घटकाप्रती मानवी मूल्यांची जपणूक करून कामे पूर्ण करीत राहिल्यास देशाचे भवितव्य उज्वल होईल. अडचणीवर मात करीत विद्यापीठ आणि समाजाच्या भल्यासाठी कष्ट करण्याचा प्रयत्न करा. यावेळी कौशल्ये विकास अधिकारी महेश चव्हाण, डॉ. रॉड यांच्यासह प्रशिक्षण शिबिरार्थी, विद्यापीठातील प्रशासकीय सेवक उपस्थित होते.

# प्रामाणिकता मानवी सद्‌गुणांचा पाया

## कुलसचिव डॉ. नांदवडेकर; विद्यापीठात 'प्रशासकीय कौशल्ये' संदर्भात शिबिर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

प्रामाणिकता हा सर्व मानवी सद्‌गुणांचा पाया आहे. आपली दूरदृष्टी जगाच्या कल्याणासाठी असली पाहिजे, ती स्वत:पुरती मर्यादीत असू नये, असे प्रतिपादन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे विद्यापीठातील प्रशासकीय सेवांकरिता 'प्रशासकीय कौशल्ये' वृद्धींगत करण्याच्या दृष्टिकोनातून आयोजित दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिरात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी बहाई अॅकॅडमीचे संचालक डॉ. लेझन आझादी होते.

डॉ. नांदवडेकर म्हणाले, आयुष्यामध्ये यशस्वी होण्यासाठी कामामधील वेगळेपण टिकवून ठेवणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाचा वापर जागरूकतेने आणि नवनिर्मितीसाठी करावे. कामाचे योग्य पद्धतीने नियोजन आणि व्यवस्थापन केल्यास कोणत्याही प्रकारचे ताण येणार नाही. पुणे येथील तज्ज्ञ साधन व्यक्ती डॉ. रचना शिखरे, अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव यांनी मनोगत व्यक्त केले. प्रशिक्षणामध्ये विद्यापीठातील ५० प्रशासकीय सेवकांचा समावेश होता.



**कोल्हापूर : विद्यापीठातर्फे प्रशासकीय सेवकांकरिता आयोजित निवासी प्रशिक्षण शिबिरात बोलताना कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर. डॉ. ए. एम. गुरव, डॉ. लेझन आझादी.**



पाचगणी : शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे प्रशासकीय सेवकांकरिता आयोजित शिबिरामध्ये बोलताना कुलसचिव डॉ. डॉ. विलास नांदवडेकर.

# प्रामाणिकता मानवी सद्गुणांचा पाया : डॉ. विलास नांदवडेकर

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

प्रामाणिकता हा सर्व मानवी सद्गुणांचा पाया आहे. आपली दूरदृष्टी जगाच्या कल्याणासाठी असली पाहिजे, ती स्वतःपुरती मर्यादित असू नये, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या वतीने विद्यापीठातील प्रशासकीय सेवकांकरिता 'प्रशासकीय कौशल्ये' वृद्धिंगत करण्याच्या दृष्टिकोनातून दोनदिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिर पाचगणी येथील बहाई ॲकॅडमी येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्रशासकीय सेवकांना मार्गदर्शन करताना कुलसचिव डॉ. नांदवडेकर बोलत होते.

पुणे येथील डॉ. रचना शिखरे तणाव व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करताना म्हणाल्या, कार्य पद्धतीचा उत्कृष्ट नमुना निर्माण करण्यासाठी स्वतःमध्ये योग्य बदल करणे आवश्यक आहे. अनावश्यक मानसिक ताणाचे ओझे वाहणे टाळावे.

नकारात्मक विचारांपासून नेहमी अलिप्त राहिले पाहिजे. स्वतःवर असलेला विश्वास, मानवी जीवन मजबूत बनविण्यासाठी खूप उपयुक्त ठरतो. चालणे, फिरणे, सायकल चालविणे, व्यायाम करणे, मनमोकळे हसणे, निसर्गाच्या सान्निध्यात राहणे, खेळणे या प्रकारांमुळे ताण-तणावपासून दूर होण्यास उपयोग होतो.

यावेळी अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव यांनी व्यवस्थापन कौशल्ये विकसित करण्यासंदर्भात मार्गदर्शन करताना म्हणाले, आपण आपल्या कामाप्रति उत्तरदायी होण्याचा नेहमी पूर्ण प्रयत्न करावा. कुटुंबामध्ये चांगला समन्वय साधल्यास समाजामध्ये, कामाच्या ठिकाणी उत्तम समन्वय साधता येईल. एकाच वेळेस दोन पद्धतीने विचार केल्यास समस्या सोडविण्यास मदत होते.

अध्यक्षीय मनोगतामध्ये बहाई ॲकॅडमीचे संचालक डॉ. लेझन आझादी म्हणाले, प्रत्येक घटकाप्रति मानवी मूल्यांची जपणूक करीत कामे पूर्ण करत राहिल्यास देशाचे भवितव्य उज्ज्वल होईल. यावेळी कौशल्ये विकास अधिकारी महेश चव्हाण, डॉ.रॉड उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे पाचगणी येथील बहाई अ‍ॅकॅडमीत आयोजित दोनदिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिरात बोलताना कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर.

# प्रामाणिकता मानवी सद्‌गुणांचा पाया

## डॉ. नांदिवडेकर; कौशल्य विकास केंद्रातर्फे प्रशिक्षण

**कोल्हापूर, ता. १३ :** प्रामाणिकता हा सर्व मानवी सद्‌गुणांचा पाया आहे. आपली दूरदृष्टी जगाच्या कल्याणासाठी असावी. ती स्वत:पुरती मर्यादित असू नये, असे प्रतिपादन कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे पाचगणी येथील बहाई अ‍ॅकॅडमीत झालेल्या दोनदिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिरात ते बोलत होते. विद्यापीठातील प्रशासकीय सेवकांसाठी प्रशासकीय कौशल्ये वृध्दींगत करण्याच्या हेतूने त्याचे आयोजन केले होते.

डॉ. नांदवडेकर म्हणाले, ''आयुष्यात यशस्वी होण्यासाठी कामातील वेगळेपण टिकवून ठेवावा. विद्यापीठाच्या भविष्यकालीन उत्तम वाटचालीसाठी परिश्रमपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. तंत्रज्ञानाचा वापर जागरूकतेने आणि नवनिर्मितीसाठी करायला हवा. कामाचे योग्य पद्धतीने नियोजन आणि व्यवस्थापन केल्यास कोणत्याही प्रकारचे ताण येणार नाही आणि आरोग्यावरही त्याचा परिणाम होणार नाही.''

डॉ. रचना शिखरे तणाव व्यवथापनाबाबत म्हणाल्या, ''कार्य पध्दतीचा उत्कृष्ट नमुना निर्माण करण्यासाठी स्वत:त योग्य बदल करणे आवश्यक आहे. अनावश्यक मानसिक ताणाचे ओझे वाहणे टाळावे. नकारात्मक विचारांपासून अलिप्त राहिले पाहिजे. स्वत:वर असलेला विश्वास, मानवी जीवन मजबूत बनविण्यासाठी खूप उपयुक्त ठरतो. चालणे, फिरणे, सायकल चालविणे, व्यायाम करणे, मनमोकळे हसणे, निसर्गाच्या सानिध्यात राहणे, खेळणे या प्रकारांमुळे ताण-तणावपासून दूर होण्यास निश्चित उपयोग होतो.''

अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव व बहाई अ‍ॅकॅडमीचे संचालक डॉ. लेझन आझादी यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी कौशल्ये विकास अधिकारी महेश चव्हाण, डॉ. रॉड उपस्थित होते.

# ‘यशस्वी होण्यासाठी वेगळेपण टिकवावे’

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** आयुष्यामध्ये यशस्वी होण्यासाठी आपल्या कामामधील वेगळेपण टिकवून ठेवणे आवश्यक आहे. विद्यापीठाच्या भविष्यकालीन उत्तम वाटचालीसाठी परिश्रमपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. तंत्रज्ञानाचा वापर जागरूकतेने आणि नवनिर्मितीसाठी करावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्यावतीने विद्यापीठातील प्रशासकीय सेवकांकरिता पाचगणी येथील बहाई अकॅडमी येथे शनिवारी (दि. ११) आणि रविवारी (दि. १२) निवासी प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. त्यामध्ये ते बोलत होते. अध्यक्षस्थानी बहाई अकॅडमीचे संचालक डॉ. लेझन आझादी होते. या शिबिरात पुणे येथील डॉ. रचना शिखरे यांनी तणाव व्यवस्थापनाबाबत, तर विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव यांनी व्यवस्थापन कौशल्ये विकसित करण्यासंदर्भात मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणामध्ये पन्नास प्रशासकीय सेवकांचा समावेश होता. यावेळी महेश चव्हाण, डॉ. रॉड उपस्थित होते.

# रामकंदाची ओळख पटवण्यात यश

## कोल्हापुरातील संशोधकांनी शोधले शास्त्रीय नाव

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

रामकंद वनस्पतीची शास्त्रीय ओळख पटवण्यात कोल्हापुरातील संशोधकांना यश आले आहे. न्यू कॉलेजमधील प्रा. डॉ. विनोद शिंपले, डॉ. नीलेश पवार व शिवाजी विद्यापीठात वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. मानसिंगराज निंबाळकर यांनी रामकंद या वनस्पतीचे शास्त्रीय नाव अगॅव्ह सिसालाना असल्याचे स्पष्ट केले.

या कंदमुळात बोर, वराहकंद, नेली, हाळीव, करवंद वनस्पतीचा समावेश होतो. बाजारात रामकंद म्हणून विविध वनस्पतींची विक्री होते. यांपैकी काही ज्योतिबा डोंगरावर तर विविध यात्रेत विकली जातात. रामकंदाची शास्त्रीय माहिती उपलब्ध नव्हती. या वनस्पतीचे शास्त्रीय नाव शोधण्याचा प्रयत्न यापूर्वीही शास्त्रज्ञांनी केला होता. मात्र, त्यांना यश आले नव्हते. याबाबतचे संशोधन देशातील नामवंत करंट सायन्स पत्रिकेतून प्रकाशित झाले.

संशोधन पथकाने रामकंदाचे काही काप विकत घेऊन त्यावरील व्हॅस्क्युलर बंडलची मांडणी पाहिली. ती विखुरलेले आढळली. त्यातून ही वनस्पती एकदलीय कुळातील असल्याचे निष्कर्ष काढण्यात आले. जगातील सर्व एकदलीय कुळातील वनस्पतींना आगंतुक तंतुमुळे असतात. या कापाची सूक्ष्मनिरीक्षकाखाली पाहणी केली असता तो काप मुळांचा नसून खोडाचा असल्याचे निदर्शनात आले. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून डीएनए बारकोडिंग करण्यात आले. त्यानंतरच्या संशोधनात ही वनस्पती परदेशातून आयात केली नसून ती माळरानावर आढळून येणारी घायपात किंवा केकतड असल्याचे सिद्ध झाले.



प्रा. डॉ. विनोद शिंपले, डॉ. नीलेश पवार व प्रा. डॉ. मानसिंगराज निंबाळकर यांनी रामकंदाच्या शास्त्रीय नावाचे संशोधन केले.

> रामकंदाचा भाग मुळांचा नसून खोडाचा आहे. त्यामुळे साहजिकच संशोधकांची नजर वनस्पतीच्या मुळावर जाते. या वनस्पतीची खरी ओळख होऊ नये म्हणून ही केलेली क्लृप्ती होती. मात्र, संशोधनाद्वारे याची ओळख पटवण्यात यश आले.
>
> प्रा. डॉ. विनोद शिंपले

> रामकंदाची शास्त्रीय ओळख पटवण्यात डीएनए व बारकोडिंगसारख्या अत्याधुनिक पद्धतीचा वापर करण्यात आला. भविष्यात या पद्धतीचा वापर करून अनेक वनस्पतीपर्यंत पोहचणे शक्य होईल.
>
> – प्रा. डॉ. मानसिंगराज निंबाळकर

# पर्यावरणप्रेमींनी साधला वनस्पतींशी संवाद

## बॉटॅनिकल गार्डन 'मटा' नेचर वॉकला उदंड प्रतिसाद

कोल्हापूर टाइम्स टीम

देशभरातील पामच्या ११० प्रजाती, परातीपेक्षा भले मोठे व्हिक्टोरिया ॲमेझॉनिकेचे पान आणि पश्चिम घाटातील दुर्मिळ, लोप पावत चाललेल्या शंभरहून अधिक प्रजाती असलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या बॉटॅनिकल गार्डनशी कोल्हापुरातील पर्यावरणप्रेमी नागरिकांनी 'महाराष्ट्र टाइम्स'च्या 'नेचर वॉक'द्वारे संवाद साधला. पृथ्वीरक्षण करण्यासाठी प्रत्येक झाड आणि रोपांचे संवर्धन करण्याचा निर्धार सहभागी पर्यावरणप्रेमींनी केला.

विद्यापीठाच्या बॉटनी विभागाने तीन दशकांच्या परिश्रमातून बॉटॅनिकल गार्डनची उभारणी केली आहे. केंद्रीय मंत्रालयाने याला भारतातील लीड बॉटॅनिकल गार्डन म्हणून मान्यता दिली असून १२००हून अधिक वनस्पतीच्या प्रजाती येथे आहेत. त्यांची माहिती पर्यावरप्रेमी नागरिकांना व्हावी यासाठी 'मटा'ने सोमवारी 'नेचर वॉक'चे आयोजन केले होते. त्याला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. सकाळी अकरा वाजता विवेकानंद कॉलेज, गोखले कॉलेज, न्यू कॉलेजमधील विद्यार्थी, पर्यावरणप्रेमी नागरिक, अभ्यासक नेचर वॉकमध्ये सहभागी झाले. बॉटनी विभागप्रमुख वर्षा जाधव-राठोड यांनी उपस्थितांचे स्वागत करून माहिती दिली. ४५ एकरमध्ये परसलेल्या या गार्डनमधील दुर्मीळ वनस्पतींची माहिती देत विभागातील अभ्यासक, विद्यार्थ्यांनी सहभागी नागरिकांची सहा गटांत विभागणी करून गार्डनची सैर घडवली. माहिती घेताना विद्यार्थी, नागरिकांनी वहीत नोट्स घेतल्या. अनेकजण मोबाइलवर झाडांचे फोटो काढले.

पाम विभागातील अर्ध सुपारी, फॉक्स टेल, बिस्मार्क यांसह अनेक प्रजातींची माहिती देण्यात आली. शंभर वर्ष जगणारा सेंच्युरी पाम पाहण्यास सर्वांचा गराडा पडला होता. पामचे फायदे, पाम पासून तेलाची निर्मिती यांची माहिती देण्यात आली. खारफुटी मॅन्ग्रोव्ह विभागातील रोपांची माहिती घेण्यास अनेकजण उत्सुक होते. उंडी या वनस्पतीपासून तयार केलेल्या तेलाचा वापर पणती आणि समई प्रज्वलीत करण्यासाठी केला तर काजळी धरत नसल्याचे सांगितले. त्यामुळे याविषयीच्या संशोधनाकडे तेल कंपन्यांनी लक्ष केंद्रीत केल्याची माहिती देण्यात आली. पश्चिम घाटात कॅन्सर उपचारासाठी वापरली जाणारी नरक्या, नोनी, सुंदरी या झाडांची तर चामखीळवरील मलम तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मयूर शिरवा वनस्पतीची माहिती पर्यावरणप्रेमींना मिळाली. वनस्पतीच्या डिंकापासून तयार केल्या जाणाऱ्या धुपाविषयीही माहिती देण्यात आली. टीश्यू कल्चर विभागात केळीच्या गोवा मंडल आणि जी नाईन या प्रजातींच्या रोपांची माहिती देण्यात आली. अनेकांनी केळीची रोपे खरेदी केली. पचोली, गुलाबी मिरी या वनस्पतीतील फुलांचा वापर परफ्यूमसाठी केला जात असल्याची माहिती देण्यात आली.

▶▶ संबंधित वृत्त...३



अमित गद्रे

महाराष्ट्र टाइम्सच्यावतीने शिवाजी विद्यापीठात सोमवारी लीड बॉटॅनिकल गार्डनमध्ये मटा नेचर वॉकचे आयोजन केले होते. येथील व्हिक्टोरिया ॲमेझॉनिका ही वनस्पती सर्वांचे आकर्षण ठरली.

मटा नेचर वॉक

### उपयुक्त माहितीचा खजिना

शिवाजी विद्यापीठातील बॉटनी विभगाने प्रयत्नपूर्वक लीड गार्डन जपले आहे. पश्चिम घाटातील दुर्मीळ वनस्पतींच्या संवर्धनाचे प्रकल्प विभागाने राबवले आहेत. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांतील प्रकल्पातून शास्त्रीय आणि उपयुक्त माहितीचा खजिना जमा झाला आहे.







मटा नेचर वॉकमध्ये सहभागी नागरिकांना माहिती देताना बॉटनी विभागप्रमुख वर्षा जाधव - राठोड.



अमित गद्रे





महाराष्ट्र टाइम्सच्यावतीने शिवाजी विद्यापीठाच्या लीड बॉटॅनिकल गार्डनमध्ये सोमवारी नेचर वॉक आयोजित केला होता. उपक्रमानंतरडॉ. एस. आर. यादव यांनी पश्चिम घाटातील दुर्मीळ वनस्पती, त्यांचे महत्व व संवर्धनाची माहिती दिली.





दुर्मिळ वनस्पतींची माहिती घेताना ज्येष्ठ नागरिक. टिश्यू कल्चरद्वारे केळीच्या विविध प्रजातींची रोपे बनवितानाचे प्रात्यक्षिक.

# लीड गार्डन देशात सर्वोत्तम

कोल्हापूर टाइम्स टीम

पृथ्वी रक्षण

महाराष्ट्र टाइम्सच्या वतीने विद्यापीठातील बॉटॅनिकल गार्डनमध्ये आयोजित नेचर वॉकनंतर विभागातील मधुबन सभागृहात डॉ. एस. आर. यादव यांनी पश्चिम घाटातील दुर्मीळ वनस्पती, त्यांचे महत्व, संवर्धनाची माहिती दिली. शिवाजी विद्यापीठाची लीड बॉटॅनिकल गार्डन देशात सर्वोत्तम ठरली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर विभागाचे नाव झाले आहे. पश्चिम घाटातील दुर्मीळ वनस्पतींचे जतन आणि संवर्धन हा आमचा हेतू असल्याचे त्यांनी सांगितले.

व्हिक्टोरिया ॲमेझॉनिका ही वनस्पती नेचर वॉकमध्ये आकर्षण ठरली. दोन तासांच्या नेचर वॉकमध्ये प्रा. एस. एस. कांबळे, प्रा. डी. के. गायकवाड, प्रा. एन. बी. गायकवाड, डॉ. आर. व्ही. गुरव, प्रा. एस. जी. घाणे, डॉ. एम. एम. लेखक, डॉ. स्वरुपा पाटील, डॉ. कल्याणी पवार, डॉ. एम. एस. निंबाळकर, डॉ. अहिल्या वाघमोडे यांचे मार्गदर्शन लाभले.

**मटाने सुरू केलेला हा उपक्रम ही एक चांगली सुरवात आहे. अशा उपक्रमांमुळे नागरिकांचे निसर्गाबद्दलचे प्रेम वाढेल. याजोडीला पर्यावरणाबाबत एक जागृती निर्माण होण्यास मदत होईल. निसर्गाला पूरक असणारा हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे.**

– **सी. आर. चिपळूणकर,** ज्येष्ठ नागरिक

**मी वनस्पतीशास्त्राची विद्यार्थिनी आहे. आम्ही रोज अनेक वनस्पतींचा अभ्यास करतो. पण सगळ्याच वनस्पती आम्हाला प्रत्यक्षात पहावयास मिळत नाहीत. नेचर वॉकच्या माध्यमातून अनेक वनस्पती जाणून घेण्याची संधी मिळाली. अनोळखी वनस्पतींचाही परिचय झाला.**

– **ऐश्वर्या सासने,** विवेकानंद कॉलेज

**वनस्पती अभ्यासाकांबरोबरचं सामान्य नागरिकांनाही वनस्पतींतील वैविध्य, त्यांचे गुणधर्म, जीवनातील त्यांचे महत्व समजण्यास मदत होते. लोकांमध्ये पर्यावरणाबाबतीत जागृती निर्माण करण्याचे काम अशा उपक्रमांतून होते.**

– **प्रा. सतीश साळोखे,** विवेकानंद कॉलेज

**इतक्या मोठ्या प्रमाणात वनस्पतीतील वैविध्य पहिल्यांदाच पहायला मिळाले. नेचर वॉकमुळे ही संधी मिळाली. उपक्रमाचे नियोजन उत्तम झाले. अभ्यासकांबरोबरच सामान्य नागरिकांनाही उपक्रम उपयुक्त ठरला.**

– **अनिकेत सणगर,** गोखले कॉलेज, विद्यार्थी

**उपक्रमामुळे वनस्पती जगताशी ओळख होण्यास मदत झाली. शहरी भागात राहत असल्याने आपल्याला जंगली झाडे फारशी पहावयास मिळत नाहीत. जंगली झाडांच्या प्रजाती, त्यांचे गुणधर्म, औषधी वनस्पती यानिमित्ताने कळाल्या. अशा प्रकारचे उपक्रम वाढायला हवेत.**

– **डॉ. श्रुती निपाणीकर**

**आपल्याला स्थानिक पातळीवरील वैशिष्ट्ये अनेकदा माहीत नसतात. बॉटॅनिकल गार्डनच्या रुपाने कोल्हापुरातील वैविध्यपूर्ण निसर्गसंपदा अनुभवता आली. इतर प्रदेशांमधली झाडेही इथे जगवली गेली आहेत. अशा नाविन्यपूर्ण उपक्रमाचा भाग बनण्यास संधी मिळाली.**

– **उषा इंगवले,** ज्येष्ठ नागरिक